INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# बालमजुरांची सद्यस्थिती आणि प्रतिबंध

## (Current Status and Prevention of Child Labor)

**प्रा.डॉ.नवनाथ शिंदे**
समाजशास्त्र विभाग,
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय, जालना

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** http://doi-ds.org/doilink/05.2021-36576687/IRJHIS2105026

***गोषवारा (Abstract):***

*बालमजुरांची समस्या ही जागतिक पातळीवरील समस्या आहे. छोटी हॉटेल्स, चहाची टपरी, भाजीपाल्याची विक्री पासुन ते शेती, लहान मोठे कारखाने, उदयोग, वेगवेगळया वस्तूची विक्री करणारी ठिकाणे इत्यादी सर्व ठिकाणी बालमजुर मोठया प्रमाणावर आढळतात. आंतरराष्ट्रीय श्रमसंगठन (आयएलओ) नुसार जगभरात २१ कोटी पेक्षा जास्त मुलांकडून बालमजुरी करुन घेतली जाते. विकसनशील देशांत बालमजुरीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण बालकांच्या ३.९ टक्के मुले बालमजुरीचे काम करतात. बालमजुर का निर्माण होतात याच्या कारणांचा शोध घेतला असे. आढळते की, दारिद्रय, गरीबी, कुटूंबाचे विघटन, पालकांची व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा, निराधार व अनाथ मुलांची वाढती संख्या, शेती व्यवसायासाठी लागणारे मनुष्यबळ इत्यादी कारणे आढळतात. बालमजुरीला प्रतिबंध घालण्यासाठी वेगवेगळे कायदे आहेत. परंतू त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. लोकांच्या आर्थीक गरजा पूर्ण करण्यासाठी नोकरी, व्यवसायाच्या संधी उपलब्ध करणे, दारिद्रय कमी करणे, अनाथ, निराधारांसाठी शासन पातळीवरुन पुर्नवसनात्मक व्यवस्था करणे, शेती व्यवसायातील बालमजुरी कमी करण्यासाठा यांत्रीकीकरणावर भर देणे आवश्यक आहे. केवळ १२ जून हा दिवस सर्वत्र बालकामगार विरोधी दिवस म्हणून साजरा करुन चालणार नाही तर त्यासाठी कुटुंब, समाज, विविध संघटना, शासन या सर्वांनी एकत्र येऊन बालमजुरांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरच जगातील बालकांचे बालपण जिवंत राहील.*

***मुख्य शब्द (Keyword):*** *बालमजुर संकल्पना, कारणे, प्रतिबंध, उपाय.*

**प्रस्तावना :**

समाजामध्ये वेगवेगळया सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. भ्रष्टाचार, दहशतवाद, बेकारी, वृध्दांच्या, आदिवासींच्या, स्त्रियांच्या, अपंगाच्या, शिक्षण व आरोग्याविषयक समस्या केवळ विशिष्ट समाजापूरत्या मर्यादीत नाहीत तर त्या जागतीक समस्या बनल्या आहेत. या समस्या पैकी काही समस्या कमी करण्यासाठी जागतीक स्तरावरुन समान कार्यक्रम आखून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतामध्ये आणि जगामध्ये बालकांच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. बालमृत्यु , कुपोषण आणि महत्वाची समस्या म्हणजे बालमजुरी किंवा बाल कामगार ही समस्या आज मोठया प्रमाणावर निर्माण झालेली दिसून

येते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाच्या जगभरात १५.२ करोड मुले बाल मजुर आहेत. अगदी लहान वयातील शिक्षण घेण्याच्या वयातील मुले, हॉटेल, दुकाने, मोटार गॅरेज, बांधकाम, घरकाम, विडी व्यवसाय, भंगार गोळा करणे, इत्यादीमध्ये बालकामगार मोठया प्रमाणात दिसून येतात. १४ वर्षाखालील मुला-मुलींना धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. तरी पण आज अशा वेगवेगळया ठिकाणी लहान मुले काम करतांना दिसतात. त्यांच्याकडून त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक काम करुन घेतले जाते. बालकांना आपण देशाचे भावी आधार स्तंभ संबोधतो. परंतू आज बहुसंख्य मुलांचे बालपण कोमेजून टाकले आहे. जे वय शिक्षण, घेण्याचे, खेळण्याचे, आनंद घेण्याचे असते. त्या वयात त्यांना कष्टाची कामे करावी लागतात. तेंव्हा अशा मुलांना या नरक यातनामधून बाहेर काढणे गरजेचे आहे. बालमजुरीला प्रतिबंध करणे आवश्यक आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून बालमजुरांची सध्यस्थिती समजावून घेवुन बालमजुरांच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदेश** : "बालमजुरांची सध्यस्थिती आणि प्रतिबंध" या विषयावरील शोधनिबंधाचे खालील मुख्य उदेश राहीले आहेत.

१) बालमजुर ही संकल्पना समजावून घेणे

२) बालमजुरांच्या सध्यस्थितीचा अभ्यास करणे

३) बालमजुरीस कारणीभुत असणाऱ्या कारणांचा शोध घेणे

**संशोधन पध्दती :**

सदरील शोध निबंध हा दुय्यम स्त्रोतावर आधारीत आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, शासकिय प्रकाशित अप्रकाशीत आकडेवारी, मासिके, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे इंटरनेवरील उपलब्ध माहितीच्या आधारे विश्लेषण केले आहे.

**बालमजुर म्हणजे काय ?**

"सर्वसाधारणपणे मुलांच्या वयाच्या चौदा वर्षा पर्यंतचा काल हा बालपण समजले जाते. त्यामुळे जेंव्हा चौदा वर्षाच्या आतील मुले आपल्या उदरनिर्वाहासाठी शारीरिक कष्ठाची कामे करतात. तेंव्हा अशा मुलांना बालमजुर असे संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्कात ही चौदा वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा जोखमीच्या अन्य ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. त्या शिवाय कायदयात वेगवेगळया तरतूदी ही करण्यात आल्या आहेत."[१]

चौदा वर्षाखालील मुला-मुलींना शारिरीक कष्ठाची कामे करावी लागणे किंवा त्यांच्या शारीरिक क्षमतेला न पेलावतील असे श्रम करण्यास त्यांना भाग पाडणे हा कायदयानुसार गुन्हा आहे. आज हॉटेल, दुकाने, गॅरेज, बांधकाम, विडीकाम, छोटया-मोठया कारखान्यामध्ये लहान मुलांना कामावर ठेवले जाते. त्यांच्याकडून अत्यल्प मजुरीवर त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिकची कामे करुन घेतली जातात. आपण जेंव्हा हॉटेल, दुकानात जातो तेंव्हा तेथे

फक्त बोर्ड लावलेला असतो 'येथे बालमजुरांना कामावर ठेवले जात नाही' पण प्रत्यक्षात कामावर लहान मुलेच असतात. आज अशा प्रकारच्या बालमजुरांचे प्रमाण देशामध्ये मोठया प्रमाणावर आहे. त्यांची कारणे ही विविध आहेत.

**ग्रामीण व नागरीभागात असणाऱ्या बालमजुराचे प्रमाण दर्शविणारा तक्ता क्र. १**

| वर्ष | ग्रामीण भाग (द.लक्ष) संख्या | नागरी भाग (द.लक्ष) संख्या | एकुण |
|---|---|---|---|
| २०११ | ८.१ | २.० | १०.१ |
| टक्केवारी | ४०.३ | २.९ | ३.९ |

**स्त्रोत : जनगणना २०११**

२०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकुण लोकसंख्येच्या वय वर्ष ५-१४ वर्षे वयोगटातील लोकसंख्या २५.९६ द.लक्ष एवढी आहे. त्यापैकी जवळपास १०.०१ द.लक्ष म्हणजे एकूण बालकांच्या ३.९ % मुले बालमजुरीचे काम करतात. ग्रामीण भागाचा आणि नागरी भागाचा विचार केल्यास (५-१४) या वयोगटातील बालमजुरांची संख्या ग्रामीण भागात ८.१ द.लक्ष तर नागरी भागत २.० द.लक्ष एकूण १०.०१ दशलक्ष एवढी दिसून येते.

**व्यवसाय निहाय बालमजुरी करणाऱ्यांची संख्या दर्शविणारा तक्ता क्र. २**

| कामाचे क्षेत्र | संख्या (द.लक्ष) | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | २.६३ | २६.० |
| शेतमजुरी | ३.३३ | ३२.९ |
| घरगुती व्यवसाय | ०.५२ | ५.२ |
| इतर क्षेत्रे | ३.६२ | ३५.८ |

**स्त्रोत :- जनगणना २०११**

कामाच्या क्षेत्राचा विचार करता असे दिसून येते की, शेती व्यवसायात काम करणाऱ्या बालमजुरांचे प्रमाण २.६३ द.लक्ष म्हणजे २६.००% प्रमाण आढळते. शेत मजुर म्हणून काम करणाऱ्या बालमजुरांचे प्रमाण ३.३३ द.लक्ष म्हणजे ३२.९% एवढे आढळते. घरगुती व्यवसायात काम करणारे बालमजुरांचे प्रमाण ०.५२ म्हणजे ५.२% एवढे दिसते तर वरील क्षेत्राशिवाय इतर विविध ठिकाणी काम करणाऱ्या बालमजुराचे प्रमाण ३.६२ म्हणजे ३५.८% एवढे असल्याचे दिसुन येते.

**बालमजुरांचे प्रमाण सर्वाधिक असणारी राज्य दर्शविणारा तक्ता क्र. ०३**

| राज्य | एकूण संख्या (द.लक्ष) | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | २.१८ | २१.५ |
| बिहार | १.०९ | १०.७ |
| राजस्थान | ०.०८ | ८.४ |
| महाराष्ट्र | ०.७३ | ७.२ |
| मध्यप्रदेश | ०.७० | ६.९ |
| एकूण | **६.३१** | **५४.७** |

**स्त्रोत: जनगणना २०११**

देशामध्ये सर्वाधिक बालमजुराचे प्रमाण असणारे एकूण पाच राज्य आहेत त्यामध्ये उत्तर प्रदेशात २.१८ द.लक्ष म्हणजे २१.५% प्रमाण आढळते. त्यानंतर बिहार मध्ये १.०९ द.लक्ष म्हणजे १०.०७% प्रमाण आढळते. राजस्थान मध्ये ०.०८ द.लक्ष म्हणजे ८.४% प्रमाण आढळते. महाराष्ट्रामध्ये बालमजुराचे प्रमाण ०.७३ द.लक्ष म्हणजे ७.२% प्रमाण आढळते. तर मध्यप्रदेशामध्ये ०.७० म्हणजे ६.९ % प्रमाण आढळते. म्हणजे देशातील जवळपास पन्नास टक्कयाहून अधिक बालमजुराचे प्रमाण पाच राज्यामध्ये आढळते.

**बालमजुरीची कारणे :**

बालमजुरीची कारणे वेगवेगळया प्रकारची आहे. निश्चित त्याला एक घटक जबाबदार नाही. त्यामुळे बालमजुरीस जबाबदार असणाऱ्या कारणांचा शोध घेत असतांना वेगवेगळया घटकांचा विचार करावा लागेल.

- **दारिद्रय, गरीबी :**

आज देशामध्ये दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. जेथे गरीबी आहे, दारिद्रय आहे अशा कुटूंबात सदस्यांची संख्या ही अधिक असते तेंव्हा कुटूंबाच्या आर्थिक गरजा भागवतांना आई - वडीलांनी मिळवलेले उत्पन्न अपूरे पडते तेंव्हा लहान मुले वेगवेगळया ठिकाणी काम करतांना दिसून येतात.

- **कुटुंबाचे विघटन :**

“आज वेगवेगळया कारणामुळे कुटूंबे विघटीत होतात. विघटीत घटस्फोटीत कुटुंबातील मुलांना मानसिक, आर्थिक, त्रास सहन करावा लागतो. कारण पती-पत्नींच्या वादातून मतभेदातून, मुलांच्या संगोपणाचा, पालन पोषणाचा प्रश्न निर्माण होतो. मुलांची जबाबदारी घ्यायला अनेकदा दोघेही नकार देतात. तेंव्हा मुलांना घरातील वृध्दांचा आधार घेवुन तर कधी दोघांपैकी एकाकडे राहून जीवन जगावे लागते. अशा परिस्थितीत पुन्हा दोघांपैकी एकाने दुसरे लग्न केले तर मग सावत्र आई, सावत्र वडील अशी नवीन नाती निर्माण होतात. तेंव्हा त्यांच्या समस्या

अधिकच वाढत जातात. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी स्वत: अर्थिक कमाई करण्यासाठी तर कधी बळजबरीने मजूरी करण्याची वेळ बालकांवर येत असते.''[२]

- **व्यसनाधिना :**

समाजामध्ये आज मोठया प्रमाणावर व्यसनांच्या आहारी गेलेल्या लोकांचे प्रमाण वाढत आहे. दारु, मादक पदार्थ, जुगार, यासारख्या व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्ती आपल्या आर्थिक कमाईतील जास्तीत जास्त भाग तो व्यसनासाठी खर्च करतो. त्यामुळे त्याला आपल्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीमध्ये कुटूंबाच्या गरजापूर्ण करण्याकरीता आर्थिक कमाई करण्याची जबाबदारी कुटूंबातील स्त्रियांकडे, मुलांकडे जाते. अशावेळी लहान वयातच मजुरी करण्याची वेळ येते.

- **कर्ज बाजारीपणा :**

देशात दारिद्रयामध्ये, गरीबीमध्ये जीवन जगणाऱ्यांची संख्या मोठी आहे. शेती खर्चासाठी, कुटुंबातील सदस्यांचे आजारपण, मुलींचे लग्न इत्यादीच्या खर्चासाठी कर्ज घ्यावे लागते. ते कर्ज बँकेतून मिळेल असे नाही. तेंव्हा खाजगी सावकाराकडून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. व्याजाचे पैसे भरतांना त्यांना मोठया संकटांना सामोरे जावे लागते. अश्यावेळी ईच्छा असो वा नसो कुटूंबातील लहान-मोठयांना कष्ट केल्याशिवाय पर्याय राहत नाही. कर्जबाजारीपणामुळे अनेक पालक आत्महत्या करतात. तेंव्हा त्या वाचविण्याकरीता कुटूंबातील लहान मुले मजुरी करतात व कुटुंबाला आर्थिक हातभार लावतांना दिसून येतात.

- **निराधार व अनाथपण :**

निराधार व अनाथ मुलांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. दुर्देवाने अनेक मुलांचे त्यांच्यावरील आई-वडिलांचे छत्र हरवते तेंव्हा अशी मुले अनाथ, निराधार होतात. अनेकांचे जवळचे नातेवाईक असून ही त्यांची जबाबदारी घेत नाहीत. तेंव्हा अशा मुलांवर आपले पोट भरण्यासाठी मजुरी करण्याची वेळ येते.

- **शेती व्यवसाय :**

भारतात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेती व्यवसायासाठी जास्त मजुरांची संख्या लागते. शेती आणि शेतीला पुरक व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या जास्त आहे. शेतातील विविध प्रकारची कामे मुले अगदी सहजपणे करु शकतात. शाळांना सुटया असतात तेंव्हा आणि शनिवार-रविवार हमखास मुले शेती आणि पुरक व्यवसायातील कामे करतात.

**बालमजुरीला प्रतिबंध करण्याकरीता घटनात्मक तरतुदी :**

बालमजुरीला प्रतिबंध करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत कांही तरतूदी करण्यात आल्या आहेत. राज्यघटनेतील मुलभूत हक्कांच्या यादीत शोषणाविरुध्दच्या हक्काचा सामावेश करण्यात आला आहे. चौविसाव्या कलमान्वये चौदा वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी, किंवा जोखमीच्या अन्य ठिकाणी कामावर ठेवण्याचा

प्रतिबंध करण्यात आला आहे. ‘‘कारखाना विषयक कायदा १९४८ नुसार १४ ते १८ या वयोगटातील कारखाने, खाणी व जोखमीच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मुले कामगार कायदा - १९५७ नुसार १२ वर्षाखालील मुलांना मळयात कामावर घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर खान कामगार कायदा - १९५२ नुसार पंधरा वर्षाच्या आतील मुलांना कामावर घेण्यास बंदी घातली आहे. बालकामगारांची प्रथा कायमची बंद करण्याच्या उददेशाने भारत सरकारने बालकामगार प्रतिबंध व नियमन कायदा - १९८६ हा सर्व सामावेशक कायदा संमत केला आहे. या कायदयानुसार अत्यंत धोकादायक असे १३ व्यवसाय आणि ५७ प्रक्रिया उदयोगामध्ये लहान मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.’’[३]

**बालमजुरीची समस्या कमी करण्यासाठी उपाय :**

भारतामध्ये बालमजुरीची समस्या गंभीर आहे. या समस्येला विविध घटक जबाबदार आहेत. तेंव्हा ही समस्या कमी करण्यासाठी वेगवेगळया पातळीवरुन प्रयत्न करण्याची गरज आहे.

- देशातील दारिद्र्याची समस्या हीच मुळातच बालमजुरीच्या समस्येला कारणीभूत आहे. तेंव्हा देशातील दारिद्रय कमी होणे गरजेचे आहे.
- लोकांचा आर्थिक गरजा पूर्ण करता येतील अशा नोकरी, व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.
- अनाथ, निराधार मुलांसाठी शासनाने त्यांच्या शिक्षणाची निवासाची व्यवस्था करणे आवश्यक असून त्यांना आर्थिक स्वावलंबी बनविण्याकरीता कौशल्य शिक्षण देऊन त्यांचे पुर्नवसन करणे आवश्यक आहे.
- शेती व पूरक व्यवसायामध्ये मोठया प्रमाणात बालमजुरी आढळून येते तेंव्हा शेतीची कामे करण्यासाठी यंत्राचा व अन्य साधनांचा उपयोग वाढवला पाहीजे.
- ज्या वयामध्ये मुलांनी शिक्षण घ्यावयाचे असते त्यावयात त्यांना मजुरी करावी लागते. हा सुसंस्कृत समाजाला कलंक आहे. तेंव्हा सर्वांची जबाबदारी आहे की, बालमजुर निर्माण होणार नाहीत याची काळजी घेतली पाहीजे.
- बऱ्याचदा आपल्या फायदयासाठी वेगवेगळया क्षेत्रात, बालमजुरांना राबवून घेतात तेंव्हा अशा लोकांवर कायदयाने कडक कार्यवाही केली पाहीजे.
- बालमजुरी प्रतिबंधक कायदे असून चालणार नाहीत तर त्या कायदयाची योग्य अंमलबजावणी झाली पाहीजे.
- १२ जून हा दिवस सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. केवळ दिवस साजरा करुन चालणार नाही. त्यासाठी सर्वांनी जनजागृती करुन ही समस्या दुर करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

जागतीक कामगार संघटनांच्या अहवालानुसार जगभरामध्ये १५.२ करोड लहान मुले बालमजुरी करतात. भारतामध्ये जनगणना २०११ नुसार ५ ते १४ या वयोगटातील २५.९६ करोड मुलापैकी १०.०१ द.लक्ष मुले बालमजुरी

करणारी आहेत. भारतामध्ये सात ते आठ करोड मुले शिक्षणापासुन वंचित आहेत. बहुसंख्य मुले ही आपल्या कौटुंबीक व्यवसायात मदत करीत असल्यामुळे पालक त्यांना शाळेत पाठवित नाहीत. आज हजारो लहान मुलांची तष्करीकरुन एका राज्यातून दुसऱ्या राज्यात मजुरीसाठी मुले पाठवीली जातात. त्याठीकानी त्यांचे शारिरीक शोषण केले जाते. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे सदरील समस्येकडे केवळ भारतातच नाही तर जगभरातुन समस्या निर्मूलनासाठी प्रयत्न केले पाहीजेत व वर सुचविल्या प्रमाणे उपाययोजना केल्यास काही अंशी ही समस्या कमी होण्यास मदत होवु शकेल.

**संदर्भ :**


१. प्रा.व्ही.बी.पाटील, मानवी हक्क,पृ.क्र. ८०, के.सागर पब्लिकेशन्स पुणे, (२००९).

२. प्रा.जयंत घाटगे, समकालीन भारतातील सामाजिक समस्या, पृ.क्र. २७७, प्रकाश विवेक घाटगे नवेपारगाव, ता. हातकणंगले. (१९९९)

३. प्रा.व्ही.बी. पाटील, मानवी हक्क पृ.क्र. ८६, के.सागर पब्लिकेशन्स पुणे, (२००९).

४. जनगणना २०११ अहवाल - भारत सरकार